


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष २ रे | अंक : ७६६. वा | गुरुवार | दि. ०९ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# आमदारांच्या लक्षवेधी वर तरी उचित कारवाई करणार की नाही?

## जिल्हा रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरणी अधिकाऱ्यांची कारवाईस टाळाटाळ...

जनसंचलन/ बुलढाणा


**बुलडाणा येथील जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचार प्रकरणी गेल्या अनेक महिन्यांपासून केवळ चौकशी आणि कारवाईचा फार्स सुरू असून, तक्रारकर्त्यांच्या तक्रारीवर तर कारवाई नाहीच, परंतु कमीत कमी आमदार संजय गायकवाड यांनी विधानसभेत जो लक्षवेधी प्रश्न उपस्थित केला होता, त्यावर तरी योग्य ती कार्यवाही होणार आहे की नाही, अशी शंका आता उपस्थित होऊ लागली आहे.** प्रशासनाने ढिसाळपणाचा अगदी कळस गाठला असून, एक अधिकारी दुसऱ्यावर आपली जबाबदारी झटकून मोकळा होताना दिसून येत आहे. येथील जिल्हा रुग्णालयात झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या भ्रष्टाचार प्रकरणी सध्या मोठ्या प्रमाणात रणकंदन सुरू आहे. सिटी न्युज व दैनिक जनसंचलनच्या पुढाकारातून चव्हाट्यावर आलेल्या या भ्रष्टाचार प्रकरणी अनेक सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते, तसेच बुलडाण्याचे लोकप्रिय आमदार संजय गायकवाड यांनी आवाज उठवला आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज तर सातत्याने या घटनेला वाचा फोडण्याचे काम करीत आहे. सुरवातीला अधिकाऱ्यांनी हा भ्रष्टाचार दाबण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु काहीही झाले तरी भ्रष्टाचार दबत नसल्याचे पाहून मग मुंबईपासून ते अकोल्यापर्यंत आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी या भ्रष्टाचाराच्या प्रकरणाला चौकशीच्या चक्रव्यूहात अडकवण्याचे काम केले आहे. आजवर विविध चौकशी समित्यांच्या

**पोस्टमार्टम ८०**

वतीने या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात आली. बरेच वरिष्ठ अधिकारी या ठिकाणी येऊन चौकशी करून गेले व बरेच कागदपत्रही घेऊन गेले. परंतु आजवर या चौकशीत काय निष्पन्न झाले? या भ्रष्टाचारात कोण-कोण दोषी आहेत? कोणावर काय कारवाई झाली? या एकाही प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही.सर्व काही गुलदस्त्यात असून तक्रारकर्त्यांनी करोडो रुपयांचे भ्रष्टाचार केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्याची पूर्ण माहिती गोळा करून योग्य वेळी संबंधित प्रशासनाला देण्याचे कळते व आलेल्या प्रत्येक निधीची कागदोपत्री कशी वाट लावून जी काही चल अचल संपत्ती खरेदी केली त्याची पूर्ण माहिती व चित्रफीत सिटी न्यूजकडे दिली.असून आता दोषींकडून प्रशासन भ्रष्ट्याचारातील करोडो रुपये व्याजासह वसूल करून त्यांच्यावर फोजदारी दाखल करतात की त्यावर पांघरूण टाकण्याचा प्रयत्न करतात त्यानंतर त्या अधिकाऱ्यांना तक्रारकर्त्यांच्या प्रत्येक प्रश्नाल सामोरे जावे लागेल हे नक्कीच जिल्हा शल्यचिकित्सकांना माहिती विचारली तर ते आरोग्य उपसंचालकांकडे बोट दाखवतात, तर आरोग्य उपसंचालकांना विचारले असता, ते राज्यस्तरीय चौकशी समितीकडे बोट दाखवून मोकळे होतात. कारवाई मात्र कोणीही करायला तयार दिसून येत नाहीत. त्यामुळे हे सर्व बनावट असल्याचे समोर येऊ लागले आहे. वारंवार

**आता पर्यंत जी काही चौकशी पथके बुलडाणा मुख्यालयात येऊन गेलीत व पहाणी केल्याचे चुकीचे अहवाल दिल्याची चर्चा सामान्य रुग्णालयात सुरू आहे. तक्रारकर्त्याची मागणी आहे सर्व साहित्य उपकरणे निधी व वर्क ऑर्डर प्रमाणे खरेदी केल्यागेली त्याची ऑन केमेरा पहाणी होणे गरजेचे आहे.**

चौकशी समित्या नेमायच्या, चौकशी केल्याचे फार्स करायचे, थातूरमातूर कागदपत्रे गोळा करायची आणि नंतर चौकशी अहवाल बासनात गुंडाळून ठेवायचे, हा प्रकार येथे सुरू आहे. एकीकडे भ्रष्टाचाऱ्यांना वाचवण्याचा आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हा प्रयत्न अत्यंत निषेधार्ह व संतापजनक आहे. सामाजिक कार्यकर्ते वारंवार आवाज उठवत आहे मात्र त्यांना वरिष्ठ अधिकारी दाद देण्यास तयार नाहीत. अधिकारी तर भ्रष्टाचाराचा भंडाफोड करणाऱ्या मीडिया व सामाजिक कार्यकर्त्यांना भाव देत नाही, परंतु आता तक्रारकर्त्यांनी माहिती डोलू की दोषींवर कारवाई न झाल्यास जिल्हाभर आंदोलन करणार या प्रकरणात कमीत कमी थेट विधानसभेत बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी लक्षवेधी उपस्थित केली होती, कमीत कमीत त्या लक्षवेधीचा सन्मान करून अधिकाऱ्यांनी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे गरजेचे आहे. **काही महिन्यांपूर्वी तत्कालीन भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांच्यावर निलबनाची कारवाई करण्यात आली. एका अधिकाऱ्यावर कारवाई करून बाकीच्यांना वाचवण्याचा**




**प्रयत्न अधिकारी करीत आहेत.मात्र, ही कारवाई फारच नगण्य व त्रोटक आहे** कारण या प्रकरणी डझनवार अधिकारी दोषी आहेत, त्यामुळे एकालाच बळीचा बकरा बनवून फायदा नाही. या घोटाळ्यातील सर्वच दोषींवर कारवाई करणे गरजेचे आहे. आज जर विधानसभेत लक्षवेधी मांडल्या गेल्यानंतरही जर वरिष्ठ अधिकारी कारवाई करीत नसतील, तर यावरून हे स्पष्ट दिसून येत आहे की, प्रशासनात बसलेले अधिकारी हे अत्यंत कोडगे आणि निर्लज्ज झाले आहेत. त्यामुळे या भ्रष्टाचाराचे तार आरोग्य विभागातील वरपर्यंत पोहोचलेले आहेत, हे स्पष्ट आहे. यावरून चौकशी समित्या केवळ फार्स असून, जनतेच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा प्रकार असल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे अशा नालायक अधिकाऱ्यांवर जोपर्यंत कारवाई होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज आपली भ्रष्टाचारविरोधातील मोहीम कधीही शांत करणार नाही.

अजून बरेच काही पुढील भागात...

# अवैध रेती वाहतूक करणाऱ्या भरधाव ट्रक ने दोन पादचारी महिलांना चिरडलं...

## एका महिलेचा अपघात स्थळी मृत्यू तर दुसरी महिला गंभीर जखमी...

जनसंचलन/नांदूरा

बुलढाणा जिल्ह्यात अवैध रेती वाहतूक सुरूच असून यामुळे अपघाताचे प्रमाण ही वाढलेले आहे.अवैध रेती वाहतूक करणारे भरधाव तसेच निष्काळजी पणाने वाहन चालवत असल्याने हे अपघात होत असल्याचे अनेकदा समोर आलेय. मात्र यावर प्रशासन अद्याप कारवाई करताना दिसत नाहीय.. आज सकाळी सुद्धा नांदुरा येथे अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रक ने पादचारी महिलांना चिरडले . यातील एका महिलेचा घटना स्थळवर मृत्यू झाला तर दुसऱ्या एका महिलेला जबर मार लागल्याने तिला उपचारासाठी रुग्णालयात भरती करण्यात आलेय .या जखमी महिलेची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितल्या जात आहे. विशेष म्हणजे आठवडा भरात अवैध रेतीच्या वाहनाने अपघात घडून जिल्ह्यात चार जण ठार झाल्याची माहिती आहे वनिता बोचरे अस मृत महीलेच नाव असून गीता ढगे असे गंभीर जखमी महिलेच नाव आहे.पोलिसांनी घटनास्थळ चां पंचनामा केला असून आरोपी वर गाडी चालकावर गुन्हा दखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे .





# शेतकऱ्यांनी बियाणे उगवण क्षमता तपासणी करावी

## कृषि विभगाचे आवाहन

**जनसंचलन/बुलडाणा**

येत्या खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांनी बियाणांची उगवण क्षमता तपासावी, असे आवाहन कृषि विभागाने केले आहे. शेतकऱ्यांमध्ये प्रत्येक वर्षी नवीन बियाणे खरेदी करुनच पेरणी करावी, असा समज आहे. परंतू सोयाबीन, मूग, उडीद, चवळी, हरभरा, भुईमुग, गहू या पिकांमध्ये स्वपरागसिंचन होत असल्याने कोणतेही संकरीत वाण या पिकांमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे सरळ वाणांचे बियाणे एकदा विकत घेतल्यानंतर त्यापासून तयार होणारे पिक आपण पुढे दोन वर्ष बियाणे म्हणून वापरु शकतो. त्यामुळे अनावश्यकपणे बाजारामधून दरवर्षी बियाणे खरेदी करण्याची आवश्यकता नाही. त्याचबरोबर बाजारातून विकत आणलेले महागडे बियाणे उगवण आले नसल्यामुळे पेरणीकरीता वापरलेली खते, मनुष्यबळ आदी वाया जाते. तसेच लेखी तक्रार, पंचनामा यामुळे पेरणीचा कालावधी निघून जाण्याचा धोका असतो. त्यामुळे कंपनीचे विकत घेतलेले बियाणे असले तरी बियाणे उगवण क्षमता तपासूनच शेतकऱ्यांनी पेरणे करावी. उगवण क्षमता तपासणी करण्याच्या सोप्या पद्धती आहेत. यात गोणपाट वापरुन बियाण्याच्या प्रत्येक पोत्यातून खोलवर हात घालून मुठभर धान्य बाहेर काढावे. सर्व पोत्यातून काढलेले धान्य एकत्र करुन घ्यावे. गोणपाटाचे सहा चौकोनी तुकडे घेऊन स्वच्छ धुवून घ्यावे. एक तुकडा जमिनीवर पसरावे. पोत्यातून काढलेल्या धान्यातून सरसकट १०० दाणे मोजून दीड-दोन सेंमी अंतरावर साधारणपणे बोटाचे एक कांड अंतरावर १०-१०च्या रांगेत गोणपाटाच्या एक तुकड्यावर ओळीत ठेवावे. अशा प्रकारे १०० दाण्याचे ३ नमुने तयार करावेत. गोणपाटावर चांगले पाणी शिंपडून ओले करावे. बियाण्यांवर दुसरा गोणपाटाचा तुकडा अंथरुन पुन्हा चांगले पाणी मारावे. गोणपाटाच्या तुकड्याची बियाण्या सकट गुंडाळी करुन थंड ठिकाणी सावलीत ठेवावे. त्यावर अधून-मधून पाणी शिंपडून ओले ठेवावे. ६-७ दिवसानंतर ही गुंडाळी जमिनीवर पसरुन उघडावे. चांगले कोंब आलेले दाणे वेगळे करून मोजावेत. तिनही गुंडाळ्याची सरासरी काढून १०० दाण्यांपैकी ७० किंवा त्यापेक्षा जास्त दाणे, जर चांगले कोंब आलेले असतील तर बियाणे बाजारातील बियाण्यासारखेच गुणवत्तेचे आहे, असे समजावे आणि शिफारशीप्रमाणे मात्रेत पेरणीसाठी वापरावे. उगवण झालेल्या बियाण्याची सरासरी संख्या ७० पेक्षा कमी असेल तर एकरी बियाण्यांचे प्रमाण थोडे वाढवून पेरणी करावे. पेरणी करताना बियाण्यास बुरशीनाशक आणि जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी. वर्तमान पत्राचा कागद वापरून बियाणांची उगवण क्षमता तपासता येते. यासाठी वर्तमानपत्राचा एक कागद घेऊन त्याच्या चार घड्या पाडाव्यात, त्यामुळे कगदाची जाडी वाढेल नंतर तो पुर्ण कागद पाण्याने ओला करावा. प्रत्येकी दहा बिया घेऊन त्या एका रांगेत समान अंतर सोडून वर्तमानपत्राच्या टोकाच्या भागावर ठेवून त्याची गुंडाळी करावी. अशारितीने शंभर बियांच्या दहा गुंडाळ्या तयार कराव्यात. त्या गुंडाळ्या पॉलिथिन पिशवीत चार दिवस तशाच मोजावे. चार दिवसानंतर त्यामधील अंकुर मोजावेत. पाण्यात भिजवून कमी वेळात उगवण तपासणीसाठी बियाण्याच्या प्रत्येक पोत्यातून खोलवर हात घालून मुठभर धान्य बाहेर काढावे. सर्व पोत्यातून काढलेले धान्य एकत्र करुन त्या नमुन्यातून १०० दाणे मोजून वेगळे काढावे, असे १०० दाण्यांचे ३ संच तयार करावे. शक्यतो काचेच्या तीन ग्लासात पाणी घेऊन त्यात हे १०० दाणे टाकावे. ५ ते ७ मिनीट तसेच राहू द्यावे. त्यानंतर पाणी फेकुन देऊन दाणे वेगळे काढून त्यामधील पूर्णतः फुगलेले, तसेच बियाण्याच्या टरफलावर सुरकुत्या पडलेले दाणे वेगळे करावे. दोन्ही प्रकारच्या दाण्यांची संख्या मोजून घ्यावी. दाणा ५६ मिनीट पाण्यात ठेवल्यानंतर चांगला टम्म फुगल्यास पेरणीसाठी अयोग्य असतो. अशा बियाण्यांच्या टरफलाला इजा झालेली असल्याने किंवा बिजांकूर कुजल्यामुळे त्यामध्ये पाणी लवकर आत शिरते. तो लवकर फुगतो. मात्र जे बियाणे चांगले असते त्याचे टरफल शाबुत असल्यामुळे त्याच्यात पाणी आत शिरत नाही, फक्त टरफलातून पाणी आत गेल्यामुळे त्यावर सुरकुत्या पडल्यासारखे दिसते. १०० दाण्यांपैकी जर सरासरी ७० किंवा जास्त दाणे अशाप्रकारे न फुगलेले, सुरकुत्या न पडलेले असल्यास बियाणे बाजारातील बियाण्यासारखेच गुणवत्तेचे आहे, असे समजावे आणि शिफारशीप्रमाणे मात्रेत पेरणीसाठी वापरावे. उगवण झालेल्या बियाण्यांची सरासरी संख्या ७० पेक्षा कमी असल्यास एकरी बियाण्यांचे प्रमाण थोडे वाढवून पेरणी करावी. पेरणी करताना बियाण्यास बुरशीनाशकांची व जिवाणू संगर्धकाची प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

# घटमांडणीतील राजकिय भाकित तूर्त पाकिटात बंद ठेवा!.



**जनसंचलन/बुलडाणा**

जिल्ह्यातील भेंडवळ येथे अक्षय तृतीयेला घटमांडणीचे भाकित सांगण्याची परंपरा आहे. कुरडई,सांडई, पापड,भजी आदी खाद्यपदार्थ व काही कडधान्ये,तृणधान्ये आदींची घटमांडणी करुन त्यात एका रात्रीतून होणा-या बदलांवरून येत्या वर्षातील पीक-पाणी,देशाचे सीमा संरक्षण, तसेच राजाच्या भवितव्याचे भाकित वर्तवले जात असते.ही भाकिते वास्तवाशी कितपत जुळतात हा चिकित्सेचा विषय असू शकतो. सद्या देशात एकूण सात टप्प्यात लोकसभा निवडणूक होत असून आता मतदानाचा तीसरा टप्पा पार पडत आहे.जनतेचे म्हणजेच देशाचे भवितव्य ठरवणारी ही महत्वपूर्ण निवडणूक आहेअशातच भेंडवळच्या घटमांडणीतील भाकिताकडे देशाचे लक्ष लागले आहे वगैरे बातम्या आतापासून उगवत आहेत. या घटमांडणीपश्चात लोकसभा निवडणूकीच्या मतदानाचे महाराष्ट्रात दोन तर देशात चार टप्पे राहिलेले असणार.अशा परिस्थितीत घटावरील पानसुपारी किंवा कुरडई - सांडईच्या स्थितीवरून देशाचा राजा स्थिर राहणार की बदलला जाणार ?याविषयीचे भाकित वर्तवले जाईल.अळीचा अजगर आणि बेडकाचा बैल करणारी प्रसारमाध्यमे भाकितांची मोठ्ठी बातमी देत लोकांचे लक्ष वेधून घेत असतात. तात्पर्य,राजाबाबतच्या कोणत्याही भाकिताच्या प्रसिद्धीचा प्रभाव लोकसभेच्या उर्वरित मतदारसंघांवर पडू नये किंवा त्या आधारावर राजकीय पक्षाकडून सोयीस्कर दिंडोरा पिटला जाऊ नये यासाठी घटमांडणी आधारित राजकिय भाकित यावर्षी त्याचदिवशी जाहिर न करता ते बंद लिफाफ्यात लिहून ठेवून ४ जूनला उघडून पडताळून पाहणे न्यायाचे ठरेल असे वाटते.

# उभ्या दुचाकीवर दुचाकी आदळली, एकाचा मृत्यू




**जनसंचलन/ खामगाव**

उभ्या दुचाकीला दुचाकीने जबर धडक दिल्याने त्यावर बसलेला व्यक्ती गंभीर जखमी झाल्याने उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. ही घटना खामगाव-चिखली रोडवर घडली. याप्रकरणी तक्रारीवरून सोमवारी सायंकाळी गुन्हा दाखल करण्यात आला. १० एप्रिल २०२४ रोजी सौरभ शरदचंद्र जयस्वाल (४२) यांचे वडील खामगाव-चिखली रोडवरील शेताच्या कडेला त्यांच्या मालकीची दुचाकी (क्रमांक एमएच-२८, एडब्यू-७५१३) ही उभी करून त्यावर बसले होते. दरम्यान, खामगाव तालुक्यातील टाकळी तलाव येथील रंगा कोळपे याने त्याच्या ताब्यातील दुचाकी (क्रमांक एमएच- २८, जे-१८०५) ही भरधाव चालवून धडक दिली. त्यामुळे तक्रारदार जयस्वाल यांचे वडील शरदचंद्र जयस्वाल गंभीर जखमी झाले; तसेच दुचाकीचे दहा हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला. जखमी शरदचंद्र जयस्वाल यांना सुरुवातीला खामगाव येथील आणि त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील खासगी रुग्णालयात उपचार करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांच्या वडिलांचा १९ एप्रिल रोजी रात्री २३:४० वाजता मृत्यू झाल्याचे तक्रारीत नमूद केले. या तक्रारीवरून खामगाव ग्रामीण पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# असोला येथील महिला दारूबंदीसाठी झाल्या आक्रमक

**जनसंचलन/ अंढेरा**

पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेले असोला येथे मागील काही महिन्यांपासून गावठी दारूची मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. व्यसनाधीन लोकांमुळे गावातील महिला त्रस्त झाले होत्या, अखेर सरपंच मनीषा राहुल चव्हाण यांनी पुढाकार घेत महिलांसह पोलिस स्टेशन गाठन दारूबंदी बाबत ठाणेदार यांना निवेदन देण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी गावात बैठक घेऊन दारू विक्री करणाऱ्यावर कारवाईचा इशारा दिला आहे. ठाणेदार विकास पाटील यांनी अवैध दारू विक्रेत्यावर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन महिलांना दिले. तसेच त्याच दिवशी गावातील महिला सरपंच. तंटामुक्ती अध्यक्ष. पोलिस पाटील तसेच महिला आणि नागरिकांची गावातील मंदिरावर बैठक घेत दारूच्या दुष्परिणामाबाबत माहिती दिली. तसेच अवैध दारू विक्री करणाऱ्यावर मुंबई दारूबंदी कायदा अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात येईल. तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी गावात कठे अवैध दारू विक्री होत असल्याचे ठाणेदार यांना कळवावे पोलिस तत्काळ कारवाई करतील असे ठोस आश्वासन अंढेरा पोलिस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील यांनी दिले. यावेळी पोलिस उपनिरीक्षक सुरेश जारवाल व अमोल रोरे उपस्थित होते. पोलिसांनी दिलेल्या कारवाईच्या इशाऱ्यानंतर अवैध दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.




# परिवहनचे सकाळच्या सत्रात योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण

**जनसंचलन/बुलढाणा**

मे महिन्यात जास्त उष्णतामान असल्यामुळे सोमवार, दि. ६ मे पासून योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण करण्याचे कामकाज सकाळी ७ ते दुपारी ३ पर्यंत करण्यात येणार आहे, याची वाहनधारकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# जिल्हास्तरावर कृषि निविष्ठा नियंत्रण कक्ष स्थापन

जनसंचलन/बुलढाणा

खरीप हंगाम २०२४ मध्ये बियाणे, खते आणि किटकनाशकांबाबत शेतकरी, कंपनी प्रतिनिधी आणि बियाणे, खते व किटकनाशके विक्रेते यांना क्षेत्रीयस्तरावर अडचणी येतात. या अडचणी सोडविण्यासाठी जिल्हास्तरावर कृषि निविष्ठा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. खरीप हंगामामध्ये बियाणे पेरणीचा कालावधी अत्यंत अल्प असल्याने शेतकरी, कंपनी प्रतिनिधी आणि बियाणे, खते व किटकनाशके विक्रेते यांच्या अडचणी आणि तक्रारींचे वेळेत निराकरण होणे गरजेचे आहे. बियाणे, खते व किटकनाशके यांचे उत्पादन, प्रक्रिया, वाहतूक वितरण आणि विक्री करताना अडचणी निर्माण होतात, तसेच निर्माण झालेल्या परिस्थितीत सदर निविष्ठांचा काळाबाजार आणि साठेबाजी रोखण्यासाठी उत्पादन वितरण आणि विक्री नियंत्रित करणे आवश्यक आहे. यासाठी बियाणे, खते व किटकनाशके यांच्या गुणवत्ता व पुरवठ्याच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणीचे तात्काळ निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सदर नियंत्रण कक्षाशी दररोज सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ या वेळेत संपर्क साधता येऊ शकणार आहे. यासाठी संपर्क क्रमांक ०७२६२-२९९०३४, ९५२७५४६९८३, ८२७५३४०५४० तसेच टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० या क्रमांकावरही संपर्क करता येईल. तसेच अडचणी किंवा तक्रारी dsaobuldana.qc@gmail.com मेलवर पाठवता येतील. बियाणे, खते आणि किटकनाशके यांच्या गुणवत्ता व पुरवठा संबंधी तक्रार निवारण सुविधा केंद्राची रचना जिल्हा व तालुकास्तरावर राहणार आहे. जिल्हास्तर व्ही. एल. खोंदील, मोहीम अधिकारी, जिप ७५८८०४१००८, ०७२६२-२९९०३४, ०७२६२-२४२३४३, डी. एम. मेरत, जिल्हा कृषि अधिकारी, जिप ९४२२४४८७३७, ए. के. इंगळे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक ७५८८६१९५०५, जे. एस. वायाळ, ग्राम विकास अधिकारी, जिप ९४०४४३९००४, ए. व्ही. सिरसाट, कृषि सहाय्यक, ८२७५३४०५४० यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# खरीप हंगामासाठी १.७७ लाख मेट्रीक टन खत आवंटन मंजूर...

जनसंचलन/बुलडाणा

खरीप हंगामाच्या नियोजनाला सुरवात करण्यात आली आहे. त्यानुसार कृषि आयुक्तालयाकडून जिल्ह्याला खरीप हंगाम २०२४-२५ करीता १ लाख ७७ हजार ९०० मेट्रीक टन रासायनिक खताचे आवंटन मंजूर करण्यात आले आहे. त्यानुसार जिल्ह्याला पुरेशा प्रमाणात खताचा पुरवठा होणार आहे. जिल्ह्यात मे २०२४ अखेर १० हजार २९० मेट्रीक टन खताचा साठा आवश्यक असून आतापर्यंत १ लाख ५ हजार ४५५ मेट्रीक टन रासायनिक खत साठा उपलब्ध झाला आहे. जिल्ह्यात आज रोजी खत विक्रेत्यांकडे २०.२०.०.१३ चा ३५ हजार ९४३ मेट्रीक टन, १०.२६.२६ चा १० हजार ५०५ मेट्रीक टन, १५.१५.१५ चा ३ हजार ५७२ मेट्रीक टन, १६.१६.१६ चा १ हजार ९९३ मेट्रीक टन, २४.२४.० चा २ हजार ६४ मेट्रीक टन, १४.३५.१४ चा ३ हजार ८७३ मेट्रीक टन, युरीयाचा १८ हजार ६५३ मेट्रीक टन, डीएपी ५ हजार १०९ मेट्रीक टन, एमओपी १ हजार १८२ मेट्रीक टन, एसएसपी १९ हजार ४७५ मेट्रीक टन, इतर खते ३ हजार ८६ मेट्रीक टन खत साठा उपलब्ध आहे. शेतकऱ्यांना कृषि केंद्रामध्ये उपलब्ध खताची माहिती ../२०२२/०४/- या ब्लॉगस्पॉटवर उपलब्ध आहे. शेतकऱ्यांनी एकाच खताची मागणी करू नये. माती परिक्षणानुसार वेगवेगळ्या खताचा संतुलित वापर करावा, जेणेकरून जमिनीची सुपिकता टिकून राहून उत्पादनात वाढ होईल. शेतकऱ्यांनी रासायनिक खताची खरेदी अधिकृत परवानाधारकाकडून करावी, तसेच खरेदी केलेल्या रासायनिक खताचे पक्के देयक घ्यावे. डीएपी या खताला पर्यायी खते म्हणून १०.२६.२६, १२.३२.१६, २४.२४.० एसएसपी, १५.१५.१५, २०.२०.०,२०.२०.०१३, १४.३५.१४, युरीया आणि डीएपी या रासायनिक खताचा वापर करून, जमीन आरोग्यानुसार शिफारस केलेल्या खताचा समतोल वापर करावा. तसेच नॅनो युरीया व नॅनो डीएपी इफ्को, व आरसीएफ या उत्पादक कंपनीची खते उपलब्ध असून खताचा वापर फवारणीद्वारे करण्यात यावा. शेतकऱ्यांनी रासायनिक खते, बियाणे, किटकनाशकेबाबत तक्रारीसाठी तालुकास्तरावर तालुका कृषि अधिकारी आणि पंचायत समितीचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी यांनी केले आहे.

# वृद्ध साहित्यिक,कलाकारांनी आधार पडताळणी करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा


राज्यातील मान्यवर वृद्ध साहित्यिक, कलावंतांना मानधन योजना सांस्कृतिक संचालनालयातर्फे राबविण्यात येते. या योजनेच्या लाभासाठी वृद्ध साहित्यिक, कलाकारांनी आधार क्रमांकाची पडताळणी करावी, असे आवाहनक करण्यात आले आहे. साहित्यिक आणि कलावंत लाभार्थ्यांची माहिती संकलित आणि अद्ययावत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. आतापर्यंत राज्यातील सुमारे १७ हजार लाभार्थ्यांची आधार कार्ड नोंदणी केलेली माहिती आहे. प्राप्त झालेले आधार क्रमांक व इतर माहिती योग्य असल्याबाबतची पडताळणी करण्यासाठी संचालनालयातर्फे ऑनलाईन आधार पडताळणी लिंक तयार केली आहे. कलाकारांनी आधार नोंदणी केलेली आहे, त्यांनी mahakalasanman.org/AadharVerification.aspx या लिंकवरून आधार क्रमांक आणि इतर माहिती पडताळणी करणे आवश्यक आहे. लाभार्थी मान्यवर कलाकारांनी ऑनलाईन माहिती स्वतःच्या मोबाईलवर किंवा कॉमन सर्व्हीस सेंटर, आपले सरकार सेवा केंद्र व महा-ई-सेवा केंद्रातून पडताळणी करु शकतील. लाभार्थ्यांनी सदर लिंकवर जाऊन तात्काळ आपले आधारकार्ड पडताळणी करुन घ्यावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाने केले आहे.कलाकारांना कलाकाराचे संपूर्ण नाव, जन्मतारीख, पत्ता, जोडीदाराचे नाव, कलाप्रकार, आधार लिंक मोबाईल क्रमांक, आधार कार्ड क्रमांक, बँकेचे नाव व शाखा, खाते क्रमांक, आयएफएससी कोड आदी माहिती सादर करावी लागणार आहे. कलावंतांनी अद्याप माहिती सादर केलेली नसल्यास त्यांनी विहित नमुन्यातील माहिती भरुन तालुकास्तरावर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, तसेच जिल्हास्तरावर जिल्हा परिषद समाज कल्याण कार्यालय आणि मुंबई शहर आणि मुंबई उपनगर येथील कलावंतांनी सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय, महाराष्ट्र शासन, विस्तार भवन, पहिला मजला, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२ या कार्यालयात जमा करावेत. तसेच आधार पडताळणी करुन घ्यावी. कलावंतांची माहिती अप्राप्त राहिल्यास त्यांचे माहे एप्रिल २०२४ पासूनचे मानधन रोखण्यात येणार आहे.

# मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

जनसंचलन/बुलडाणा

महाडीबीटी प्रणालीवर सन २०२३-२४ या वर्षाकरीता भारत सरकार शिष्यवृत्ती अर्ज भरण्याकरीता मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना आता १५ जून २०२४ पर्यंत महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करता येणार आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे प्रत्येकवर्षी विजाभज, इमाव आणि विमाप्र जाती प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती आणि राज्य शासनाची शिक्षण फी, परिक्षा फी सवलत योजनेचा लाभ देण्यात येतो. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांस mahadbt.mahait.gov.in या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. सदर प्रणालीवर ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा दि. ११ ऑक्टोबर २०२३ पासून उपलब्ध करण्यात आली आहे. त्यानुसार सर्व संस्था, महाविद्यालयाच्या प्राचार्य यांनी विजाभज, इमाव आणि विमाप्र जाती प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी विजाभज, इमाव आणि विमाप्र जाती प्रवर्गाकरीता भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी, व्यावसायिक पाठ्यक्रम निर्वाह भत्ता, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करण्यासाठी दि. १५ जून २०२४ पर्यंत मुदतवाढ करुन देण्यात आली आहे. पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी मुदतीत ऑनलाईन अर्ज नोंदणी करावी. अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील अर्ज भरलेले नाहीत, अश्या विद्यार्थ्यांसाठी, तसेच सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील अर्ज रिअप्लाय करण्यासाठी विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत अर्ज भरण्याची कार्यवाही करावी. अनुसूचित जाती प्रवर्गातील योजनेस पात्र सर्व विद्यार्थ्यांनी mahadbtmahait.gov.in संकेतस्थळावर दि. १५ जून २०२४ पर्यंत अर्ज भरण्यात यावेत. तसेच सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य यांनीही प्रवेशित योजनेस पात्र असलेल्या अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज महाडीबीटी संकेतस्थळावर विहित मुदतीपूर्वी अर्ज भरुन घेण्याची कार्यवाही करावी. जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ, वरिष्ठ व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी त्यांच्याकडे प्रवेशित विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टल द्वारे आवेदन पत्रे भरण्याबाबत सूचित करावे, तसेच मुदतीत मागासवर्गीय विद्यार्थी अर्ज भरण्यापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यासाठी mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरावेत, विहित वेळेत विद्यार्थ्यांचे अर्ज भरुन घेण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहणार आहे. महाविद्यालय, विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरण्याचे आवाहन सहाय्यक संचालक मनोज मेरत यांनी केले आहे.

# सिंदखेडराजा तालुक्यातील उपविभागीय अधिकारी ॲक्शन मोडवर...



जनसंचलन/ सिंदखेडराजा

उपविभागीय अधिकारी ॲक्शन मोडवर सिंदखेडराजा अनिल दराडे सिंदखेडराजा तालुक्यातील अनेक गावातुन औवध उत्खनन सुरू असुन या वर आळा घालण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांनी अनोखी शक्कल लढवत असुन त्यावर लवकर तोडगा काढुन रेती माफिया यांचे धाबे दणाणून सोडणार माहराषठ बेरकीन न्युज सी बोलताना सांगितले या पुढे रेती माफिया यांची गय केली जाणार नाही त्या शेतकरी रेती माफिया यांना रस्ता उपलब्ध करून देतात त्या सातबारावर बोजा चढविण्याचा सुचणा मंडळ अधिकारी व तलाठी यांना लवकर आदेश काढुन ज्या शेतातून रेती वाहतूक करण्यासाठी रस्ता उपलब्ध आहे ते अगोदर सर्वे करून उपविभाग अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी यांच्या सातबारावार बोजा चढविला जाईल जो कोणी मंडळ अधिकारी व तलाठी हामगय करेल व कामचुकार पणा करेल त्या कर्म चारी यांच्या वर योग्य ती कारवाई करावी अशी सुचणा ते लवकरच कर्मचारी वर्ग ला देण्यात येणार आहे या मळे रेती माफिया याची पायाखालची जमीन सरकली आहे

# अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसच्या जवळ येतील,काही विलीन होतील शरद पवारांचं भाकित

वृत्तसंस्था/मुंबई

लोकसभा निवडणुकीनंतर अनेक प्रादेशिक पक्ष जवळ येतील. काही पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील, असं भाकित राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवारांनी वर्तवलं आहे. येत्या काळात राजकारणात मोठे बदल पाहायला मिळेतील असे संकेत पवारांनी दिले. इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी येत्या काळातील राजकारणावर सविस्तर भाष्य केलं.पुढच्या दोन वर्षांमध्ये अनेक प्रादेशिक पक्ष काँग्रेसच्या जवळ येतील. आपल्या पक्षाचं हित ओळखून काही पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होण्याचा पर्याय स्वीकारतील, असं भाकित शरद पवारांनी वर्तवलं. शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होणार का, असा प्रश्न पवारांना विचारण्यात आला. त्यावर काँग्रेस आणि आमच्यामध्ये फारसा फरक नाही. आमची विचारधारा सारखीच आहे. आम्ही गांधी, नेहरु यांची विचारधारा मानतो, असं पवारांनी सांगितलं. राष्ट्रवादीत पडलेल्या फुटीनंतर शरद पवारांच्या मागे असलेलं आमदारांचं बळ कमी झालं आहे. त्यामुळे त्यांचा गट काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याच्या चर्चा झाल्या. त्याबद्दल शरद पवारांना विचारणा करण्यात आली. मी याबद्दल आताच काही बोलणार नाही. माझ्या सहकाऱ्यांशी बोलल्याशिवाय मी काही बोलणार नाही. आमची आणि काँग्रेसची विचारसरणी मिळतीजुळती आहे. पुढचं पाऊल उचलण्याआधी सहकाऱ्यांशी चर्चा करण्यात येईल. मोदी यांच्या नेतृत्त्वाशी जुळवून घेणं अवघड आहे, असं शरद पवार म्हणाले.समान विचारधारा असलेल्या पक्षांनी एकत्रित काम करायला हवं असं उद्धव ठाकरेंनादेखील वाटत असल्याचं शरद पवारांनी सांगितलं. ठाकरेंची विचार करण्याची पद्धत आमच्यासारखीच दिसत आहे, असं पवार म्हणाले. राज्यात



सत्ताधाऱ्यांविरोधात मोठा अंडरकरंट आहे. उत्तर प्रदेशसारख्या राज्यांमध्येही हीच परिस्थिती आहे, असं निरीक्षण त्यांनी नोंदवलं.

## घरासमोरील झाड तोडायचे असेल तर घ्यावी लागेल परवानगी

## अनेकांना नियमाची माहितीच नाही सर्रास केली जाते वृक्षतोड.

जनसंचलन/ चिखली

घरा समोरील व घरच्या अंगणातील असो किंवा सार्वजनिक ठिकाणचे जाड तोडायचे असेल तर त्यासाठी ग्रामपंचायत मधील वृक्ष प्राधिकरणाची परवानगी असणे आवश्यक आहे पण अजूनही या नियमाची अनेकांना माहितीच नसल्याने सर्रास वृक्षतोड केली जात आहे विशेष म्हणजे याविरुद्ध कारवाई होत नसल्याने सर्वत्र लेबल असल्याचेच पायाला मिळते पर्यावरण संवर्धनासाठी शासनाच्या वतीने विविध उपयोजना राबविल्या जातात त्यासाठी वृक्ष प्राधिकरण समितीची स्थापना केली जाते या समितीच्या परवानगीशिवाय वृक्षतोड करणे गुन्हा आहे मात्र या समिती बद्दल फारसे कोणालाच माहिती नाही आणि ही समिती कारवाई करीत नाही कुठलेही झाड फांद्या तोडायच्या असल्यास लागते परवानगी घरासमोरील झाडांच्या फांद्या जरी तोडायच्या असल्यास तरी प्राधिकरणाची परवानगी आवश्यक असते अन्यथा गुन्हा दाखल होऊ शकतो कोणत्या कारणासाठी झाड तोडता येते झाड तोडताना सक्षम कारण समितीला द्यावे लागते बांधकाम करताना अडथळा येत असेल झाड धोकादायक बनले असेल किंवा सार्वजनिक ठिकाणी विकास कामात अडथळा निर्माण होत असेल तर अशा वेळी झाड तोडण्याची परवानगी मागता येते कुठे मिळते परवानगी वृक्षामुळे अडचण निर्माण होत असल्यास स्थानिक प्रशासनाकडे म्हणजेच नगरपालिका नगरपरिषद नगरपंचायत अथवा ग्रामपंचायत मध्ये ही परवानगी मिळते त्यासाठी स्थापन केलेल्या





समितीकडे रीतसर अर्ज करावा अर्ज कसा करावा वृक्ष प्राधिकरण समितीच्या नावाने अर्ज करावा लागतो त्या अर्जात वृक्ष तोडणे का गरजेचे आहे हे नमूद करावे लागते घटनास्थळाची पाहणी करून समिती परवानगी देते कोणतीही झाड विनापरवानगी तोडले तर संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे स्थानिक स्वराज्य प्रशासन याविरुद्ध चौकशी करून कारवाई करते ग्रामपंचायतच्या क्षेत्रात विनापरवानगी झाड तोडणे कायद्याने गुन्हा आहे हद्दीत कोणी विनापरवानगी झाड तोडल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येते

## चिखलीतून पलायन केलेल्या दोघांना संभाजीनगरमधून घेतले ताब्यात...

### अनैतिक मानवी वाहतूक कक्षाची कारवाई दोघांनाही दिले पोलिसांच्या ताब्यात

जनसंचलन/चिखली

दोन महिन्यापूर्वी चिखलीतून एका अल्पवयीन मुलीसह पलायन करणाऱ्यास अनैतिक मानवी वाहतूक कक्षाच्या पथकाने छत्रपती संभाजीनगर मधून गोपनीय माहितीच्या आधारावर ताब्यात घेतले आहे. दरम्यान सध्या पीडित अल्वयीन मुलीसह आरोपीस चिखली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. पोलिसांच्या अभिलेखावर पीडित अल्पवयीन बालक, बालिकांचे अपहरण संदर्भाने दाखल असलेल्या जिल्ह्यातील पोलिस ठाण्यामधील गुन्ह्यांच्या समांतर तपासासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक सुनील कडासने यांनी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षास आदेशित केले होते. त्यानुषंगाने चिखली येथील चालू वर्षातील एका प्रकरणातील पीडिता व आरोपी सोहम रतन आव्हाड (रा. सिद्धार्थ नगर, चिखली) यास ताब्यात घेण्यात आले आहे. प्रारंभी पुण्यातील भोसरी येथे ते असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यामुळे तेथे चौकशी केली असता संबंधित दोघे हे छत्रपती संभाजीनगर येथे आल्याचे समजले होते. त्यानुषंगाने छत्रपती संभाजीनगरमधील सिडको परिसरातून त्यांना ताब्यात घेण्यात आले. प्रकरणात चिखली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला असल्याने पीडिता व आरोपीस चिखली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ३ मे रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पथकाने ही कारवाई केली.

## लव्हाळा ते मलकापूर पांग्रा महामार्गावर गावाजवळील रस्ता दुरूस्तीसाठी निधीच मिळेना

जनसंचलन/ साखरखेर्डा

लव्हाळा ते मलकापूर पांग्रा या २२२ राज्य महामार्गावर गावाजवळील रस्ता दुरुस्तीसाठी निधीच मिळत नसल्याने मोठमोठे खड्डे पडले असून या रस्त्याच्या कामासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे अशी मागणी वाहन धारकांनी केली आहे. लव्हाळा येथून साखरखेर्डा येथे आल्यानंतर १०० मिटर रस्त्याची अत्यंत दूरावस्था झाली आहे. शेंदूर्जन गाव लागताच येथेही १०० मिटर रस्त्याचे काम सोडून देण्यात आले आहे. पुढे मलकापूर पांग्रा गावातील पुन्हा १०० मिटर रस्ता तसाच उखडून पडला आहे. या तीनही ठिकाणी मोठमोठी खड्डी पडली असून मोटारसायकल आणि चारचाकी वाहने चालवितांना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. या २२२ राज्य महामार्गावरील रस्त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी नाही का ? की जाणूनबुजून ही कामे रेंगाळत ठेवली असा प्रश्न उपस्थित होत आहे. या रस्त्याची कामे तत्काळ करावी, अशी मागणी माजी कृषी सभापती दिनकरराव देशमुख यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्याकडे वारंवार केली. परंतू हेतूपुरस्सर ही कामे रेंगाळत ठेवली जात आहे. आठ दिवसांत या तीनही ठिकाणची कामे सुरु न झाल्यास प्रत्येक खड्डयात बेशरमीचे झाड लावण्यात येईल, असा इशारा प्रवाशी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत युवक ठार एक गंभीर

जनसंचलन/ जळगाव जामोद

आसलगाव ते पळशी सुपो रोडवरील सुलज जवळ अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दुचाकीस्वार विशाल भाऊराव मांडोकार (२२) जागीच ठार झाल्याची घटना ६ मे रोजी रात्री घडली. दोनच दिवसांपूर्वी विशालला झालेली मुलगी पाहून तो गावी परतत असतांना हा अपघात झाला. विशालचे मागील वर्षीच लग्न झाले होते. प्रसूतीसाठी पत्नी खामगाव रुग्णालयात दाखल होती. प्रसूती झाल्यानंतर अपत्याला बघून चुलत भाऊ राजेश कचरू मांडोकार सह तो न मोहदेपूरकडे दुचाकीवर (एमएच-२८- बीव्ही-९४८५) जात होता. त्यावेळी अज्ञात वाहनाने जबर धडक दिल्याने विशाल जागीच ठार झाला, तर राजेश गंभीर जखमी आहे. विशालच्या पश्चात पत्नी, नुकतीच जन्मलेली मुलगी व आई-वडील असा परिवार आहे. अज्ञात वाहनाविरोधात जळगाव जामोद पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958